
# ईपीसी इंडस्ट्रीजच्या पहिल्या प्रतीक्षा शोरूमचे उद्घाटन

बुलढाणा, दि. ४ (प्रतिनिधी) - ईपीसी इंडस्ट्रीजच्या माध्यमातून देशभरात कृषी वितरण केंद्राचे जाळे निर्माण करून कृषीसंदर्भातील सर्व प्रकारच्या वस्तूंची विक्री या केंद्रामधून करण्याचे उद्दिष्ट असल्याचे प्रतिपादन ईपीसी इंडस्ट्रीजचे कार्यकारी संचालक अशोक शर्मा यांनी बुलढाणा येथे व्यक्त केले.

ईपीसी इंडस्ट्रीचे महाराष्ट्रातील पहिले कृषी दालन प्रतीक्षा शोरुमच्या रुपाने आजपासून बुलढाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या सेवेत रुजू करण्यात आले. या शोरूमचे उद्घाटन ईपीसी इंडस्ट्रीजचे कार्यकारी संचालक अशोक शर्मा यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बुलढाणा अर्बनचे अध्यक्ष राधेश्याम चांडक होते. तर प्रमुख अतिथी म्हणून शिप्रमचे अध्यक्ष रामकृष्णदादा शेटे, सामनाचे जिल्हा प्रतिनिधी राजेश देशमाने, ईपीसी इंडस्ट्रीजचे उपाध्यक्ष सुनील जॉनसन, रविकांत तुपकर, सुहास खबुतरे, प्रतीक्षा इरिगेशनचे संचालक प्रल्हाद पंडित, पुंडलिक पंडित उपस्थित होते.

यावेळी बुलढाणा अर्बनचे अध्यक्ष राधेश्याम चांडक यांनी आपल्या भाषणात बुलढाण्यात ईपीसीने सुरू केलेल्या या शोरूमचा फायदा घेऊन आपल्या शेतीचे माती परिश्रम करून योग्य त्या तज्ज्ञाच्या सल्ल्याने शेती करून आपले जीवन समृद्ध करावे, अशी अपेक्षा व्यक्त केल्या. यावेळी रामकृष्णदादा शेटे, पत्रकार राजेश देशमाने, रविकांत तुपकर यांनी देखील आपले विचार व्यक्त केले. शेवटी प्रल्हाद पंडित यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी जी.पी. बुरकुल, पी. एस. पांडे, उमेश देशमाने व ईपीसी इंडस्ट्रीजचे अधिकारी, कर्मचाऱ्यांने परिश्रम घेतले.



बुलढाणा येथे महाराष्ट्रात पहिल्या ईपीसी इंडस्ट्रीजच्या प्रतीक्षा शोरूमचे उद्घाटन करताना अशोक शर्मा, राधेश्याम चांडक व अन्य.